पोलीस सह आयुक्त, वाहतूक, मुंबई.

# वार्तापत्र

दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबईतील विविध न्यायालयांमध्ये वाहनांवरील प्रलंबित दंडाची तडजोड रक्कम भरून घेण्याकरिता लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. वाहनांवरील प्रलंबित दंडाची तडजोड रक्कम भरणेबाबत त्यांचे मोबाईलवर एसएमएस द्वारे यापूर्वी आवाहन करण्यात आले होते.

मुंबई शहर वाहतूक विभागातील दंडाची तडजोड रक्कम भरणा करण्याचे प्रलंबित असणारी चलन प्रकरणे या लोक अदालती समोर ठेवण्यात आली होती. सदर प्रकरणांतील प्रलंबित असणाऱ्या एकूण १,८५,७०३ ई-चलनांमधून एकूण १३,३१,७३,५५०/- एवढी तडजोड रक्कम वाहन धारकांकडून भरणा करून घेण्यात आली आहे.

तरी नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या वाहनांवरील प्रलंबित तडजोड रक्कम तात्काळ ऑनलाईन भरणा करावी जेणेकरून आपणास पुढील कायदेशीर प्रक्रियेस सामोरे जावे लागणार नाही.